महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

शनिवार ■ १५ नोव्हेंबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक : १४० ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

## बिहारच्या निकालानंतर भाजप कार्यकर्त्यांचा देशभरात जल्लोष

### काँग्रेसची हालत एमआयएमपेक्षाही खाली – मुख्यमंत्र्यांचा टोला

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** बिहारमध्ये भाजप एनडीए आघाडीला मोठं यश मिळालं असून बिहार विधानसभेत आता एनडी आघाडीची सत्ता येणार असल्याचं स्पष्ट झालं आहे. बिहारच्या निकालानंतर देशभरातील भाजप कार्यकर्त्यांकडून जल्लोष साजरा केला जात असून नेतेमंडळीही विजयावर प्रतिक्रिया देत आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवार, एकनाथ शिंदे यांनीही बिहार विजयावर आनंद व्यक्त केला. त्यानंतर,आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली असून काँग्रेस नेते राहुल गांधींवर हल्लाबोल केला आहे. जोपर्यंत राहुल गांधी अशाप्रकारे संवैधानिक संस्थांवर आरोप करतील तोपर्यंत काँग्रेसची हालत अशीच राहिल. काँग्रेसची हालत एमआयएमपेक्षाही खाली गेलीय, असेही मुख्यमंत्र्यांनी म्हटलं. अतिशय मनापासून बिहारच्या जनतेचं अभिनंदन करतो, आभार मानतो. बिहारच्या जनतेनं पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वावर विश्वास ठेऊन, नितीश कुमारांच्या सुशासनावर विश्वास ठेऊन प्रचंड बहुमत दिलेलं आहे. जे आकडे दिसत आहेत, त्यावरुन 2010 चा रेकॉर्ड तुटेल असा हा विजय झालेला आहे. मोदींवर बिहारच्या जनतेचं असलेलं प्रेम आपल्याला दिसून येतंय, नितीश कुमार, चिराग पासवान असतील मांझी असतील, उपेंद्र कुशावाह यांच्यासह युतीला लोकांनी प्रतिसाद दिला. जोपर्यंत राहुल गांधी अशाप्रकारे संवैधानिक संस्थांवर आरोप करतील तोपर्यंत काँग्रेसची हालत अशीच राहिल. काँग्रेसची हालत एमआयएमपेक्षाही खाली गेलीय, बिहारच्या इतिहासातील काँग्रेसचा सर्वात कमी स्कोअर आहे. राहुल गांधींनी व्होट चोरीचा मुद्दा काढला, त्यावर यात्रा काढली, नदीत उड्या टाकून बघितल्या, डान्स करुन बघितला. पण, लोकांचा विश्वास हा मोदीजी आणि नितीशकुमार यांच्यावर आहे, असे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले. तसेच, काँग्रेस आणि आघाडीतील पक्षाला आत्मपरिक्षण करण्याचा सल्लाही फडणवीस यांनी दिला आहे.



### टिटवाळ्यात पेढे वाटून आनंदोत्सव

बिहार विधानसभा निवडणुकीत एन डि ए घटक पक्षाला बहुमत मिळाले असुन संपूर्ण महाराष्ट्रात भाजप पक्षाचे वतीने आनंद साजरा करण्यात आला, मांडा टिटवाळा भारतीय जनता पक्षाच्या वतीने टिटवाळा मंदिर चौकात माजी नगरसेवक संतोष तरे यांच्या वतीने पेढे वाटून तसेच फटाके अतिशबाजी करून ढोल ताशांच्या गजरात आनंद साजरा केला, यावेळी माजी उपमहापौर उपेक्षा भोईर, भाजपचे मांडा टिटवाळा मंडळांचे अध्यक्ष शक्तीवान भोईर, जेष्ठ कायैकते गजानन मढवी, अनिल फड ,चिंतामण मगर,दिपेश तरे, मोहन तरे, अमोल केदार, विनायक भोईर, गिरीश भोय, अनिरुद्ध राणे यांच्या सह भाजप पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते, एकमेकांना पेढे भरवून आनंद व्यक्त केला.

### बिहारमध्ये मुख्यमंत्री कोण होणार?

**नितीश कुमार यांच्या नेतृत्वात बिहारमध्ये निवडणुका झाल्या आहेत. मात्र, मुख्यमंत्री कोण होणार यासंदर्भातील निर्णय पंतप्रधान नरेंद्र मोदी, अमित शाह, आमच्या पक्षाचे प्रमुख आणि नितीशकुमार हे एकत्र बसून घेतील. मुख्यमंत्री पदासंदर्भातील बोलण्याचा अधिकार मला नाही, असेही फडणवीस यांनी स्पष्ट केले. वेळोवेळी अमित शाह यांनी अतिशय स्पष्टपणे त्यासंदर्भात भूमिका मांडली आहे. आमच्या संसदीय समितीचा आणि पक्षाच्या प्रमुख नेत्यांचा तो निर्णय होईल, असेही फडणवीस यांनी सांगितले.**

## लक्षवेधी

### बिहार विजयाचा जल्लोष ठाण्यात

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** बिहार राज्यात निवडणूकांचा निकाल लागला असून या निवडणूकीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीला (एनडीए) बहुमत मिळाले आहे. या निवडणूकांच्या निकालानंतर ठाणे रेल्वे स्थानक परिसरात भाजपने मिठाई वाटत जल्लोष साजरा केला. गेल्याकाही महिन्यांपासून बिहारच्या निवडणूकांकडे देशाचे लक्ष लागले होते. या निवडणूकीमध्ये कोण विजयी होईल अशी चर्चा काही दिवसांपासून होती. भाजपला स्पष्ट बहुमत मिळाल्याचे दिसत असल्याने आता या निवडणूकीनंतर भाजपच्या कार्यकर्त्यांनी संपूर्ण देशभरात जल्लोष करण्यास सुरुवात केली. ठाणे रेल्वे स्थानक परिसरात भाजपने जल्लोष केला. ठाणे रेल्वे स्थानक परिसरात प्रवाशांना मिठाईचे वाटप करण्यात आले. भाजपच्या महिला पदाधिकाऱ्यांनी फुगडी खेळत तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री फडणवीसांच्या नावाने घोषणा दिल्या.

### पालेगावच्या शेतकऱ्याला २३ वर्षांनी न्याय

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर :** उल्हासनगर जवळील पालेगाव भागात एका बैलगाडीला एका डम्परने २९ वर्षापूर्वी जोराची धडक दिली होती. या डम्परच्या धडकेत बैलगाडीमधील एका शेतकऱ्याचा मृत्यू झाला होता. या शेतकऱ्याच्या मृत्युप्रकरणी त्याच्या वारसांनी मोटार अपघात वाहन न्याय प्राधिकरणाकडे भरपाईसाठी दावा दाखल केला होता. २३ वर्ष भरपाईसाठी लढा दिल्यानंतर मृत शेतकऱ्याच्या वारसांना न्यायधिकरणाचे न्यायाधीश पी. आर. अस्थुरकर यांनी ट्रकचा मालक आणि त्या वाहनाची विमा कंपनी यांना दोन लाख ८० हजार रूपये नुकसान भरपाई निकालाच्या दिवसांपासून सहा टक्के व्याजाने देण्याचे आदेश दिले.

### भिवंडीतील गोदामात १९ लाखांची चोरी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी, ता. १४ (वार्ताहर)** भिवंडी ग्रामीण परिसरातील गोदामात चोरी व घरफोडीच्या घटना वाढीस लागल्या आहेत. एका गोदाम घरफोडीत तब्बल १९ लाख रुपयांचा मुद्देमाल चोरी करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार काल्हेर गावच्या हद्दीत जे. के. वेअर हाउसिंग कॉम्प्लेक्स येथे तळमजल्यावरील गोदाम भाड्याने घेऊन तेथे मालाची साठवणूक केली होती. जून २०२५ ते ४ नोव्हेंबरदरम्यान अज्ञात चोरट्याने गोदामात प्रकाशासाठी लावलेला प्लॅस्टिक पत्रा उचकटून गोदामात प्रवेश करीत गोदामातील १८ लाख ९४ हजार ७८८ रुपये किमतीचा मुद्देमाल चोरी केला. याप्रकरणी नीलेश विष्णू कदम यांनी गुरुवारी (ता. १३) दिलेल्या तक्रारीवरून नारपोली पोलिस ठाण्यात घरफोडीचा गुन्हा दाखल केला आहे. या गुन्ह्याचा अधिक तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक धनराज केदार हे करीत आहेत.



### लोकलवर अश्लील जाहिरात प्रवाशांचा संताप

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

लोकल ट्रेन मुंबईची लाईफलाईन मानली जाते. दररोज लाखो प्रवासी या लोकलमधून प्रवास करतात. मात्र, हीच लोकल ट्रेन आता अश्लील पोस्टरमुळे चर्चेत आली आहे. स्टॅमिना वाढवणाऱ्या औषधाची जाहिरातीचे अश्लील पोस्टर्स झळकल्याने प्रवाशांमध्ये संताप उफाळून आला आहे. लोकल गाड्यांमध्ये लावलेले हे पोस्टर पाहून प्रवाशांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. प्रवाशांनी हे पोस्टर लवकरात लवकर काढून टाकण्याची मागणी केली आहे. कल्याण कसारा- कर्जत रेल्वे प्रवासी संघ आणि डिव्हिजनल रेल्वे यूजर्स कंस्लटेटिव्ह कमिटीतील सदस्यांनी लोकल गाड्यांवरील अश्लील जाहिरातींविरूद्ध निषेध सुरू केला आहे. दररोज लाखो प्रवासी लोकलमधून प्रवास करतात. ज्यात शालेय, महाविद्यालयीन मुले, ज्येष्ठ नागरिक आणि महिलांचा समावेश आहे. कल्याण - कसारा - कर्जत रेल्वे प्रवासी संघचे अध्यक्ष राजेश घनघव यांनी सांगितले की, 'सामाजिक नियमांकडे दुर्लक्ष करून व्यावसायिक उत्पन्नाच्या नावाखाली हे करायला हवे का?', असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

## ही लाडक्या बहिणींची कमाल!

### बिहारमध्ये एनडीएला मिळालेल्या यशानंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची प्रतिक्रीया

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** गेल्या काही दिवसांपासून संपुर्ण देशाचे लक्ष लागून राहिलेल्या बिहार विधानसभेचा निवडणुकीचा निकाल शुक्रवारी जाहीर झाला. यामध्ये भाजपा, जद (यु) आणि लोजप (रामविलास) हे पक्ष एकत्रितपणे १९१ जागांवर आघाडीवर आहेत. तर, महाविकास आघाडीला फारशे यश मिळालेले नाही. बिहारमध्ये एनडीएला मिळालेल्या यशानंतर देशभरात जल्लोष सुरू झाला असून या निकालावर राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाण्यात पत्रकारांशी प्रतिक्रिया व्यक्त केली असून त्यात बिहारच्या लाडक्या बहिणींचा उल्लेख केला आहे.

बिहारच्या जनतेने विकासाला प्राधान्य दिले, विकासावर विश्वास ठेवला, नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवला आणि त्याचबरोबर मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी केलेल्या कामावरही विश्वास ठेवला. "समोसे में जब तक रहेगा आलू, तब तक रहेगा लालू", अशी पहिली घोषणा होती. पण, आता अशी वेळ आली आहे की "जब तक रहेगा आलू, तब तक रहेगा विकास का राज!" असे शिंदे म्हणाले. लाडक्या बहिणींनी कमाल केली, विकासाला प्राधान्य दिले आणि म्हणूनच विकासराज सुरू राहणार आहे. लालू याचे जंगलराज जनतेने नाकारले आहे, असे एकनाथ शिंदे म्हणाले.



## उल्हासनगरात भाजप आणि अजितदादांना धक्का

### दोन माजी नगरसेवक, एक ग्रामीण जिल्हाध्यक्ष शिवसेनेत

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर :** उल्हासनगर महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शहरात महायुतीमधील पक्षांमध्येच रस्सीखेच पाहायला मिळते आहे. एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेने भाजपच्या दोन माजी नगरसेवकांना गळाला लावले आहे. तर त्याचवेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जुने पदाधिकारी आणि अजित दादांच्या ठाणे ग्रामीणच्या जिल्हाध्यक्षांनाही शिवसेनेत प्रवेश दिला आहे. त्यामुळे महायुतीमध्येच रस्सीखेच पाहायला मिळते आहे. मात्र भाजपचे दोन्ही नगरसेवक हे पूर्वाश्रमीचे शिवसेनेचेच असून ते स्वगृही परतले आहेत, असा दावा शिवसेनेच्या वतीने करण्यात आला आहे.

उल्हासनगर महापालिका ही कल्याण लोकसभा मतदारसंघात येते. त्यामुळे शिवसेनेचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्यासाठी उल्हासनगर महापालिका महत्वाची आहे. २०१९ मध्ये मोठी राजकीय खेळी करत येथे शिवसेनेने भाजपच्या तोंडातून महापौरपदाचा घास हिसकावला होता. त्यामुळे केंद्रात आणि राज्यात युतीत असले तरी येथे शिवसेना आणि भाजप यांच्यातच सर्वात मोठी लढाई होणार आहे.

त्यासाठी गेल्या काही महिन्यांपासून संघर्ष सुरू आहे. शिवसेना पक्षाला यंदा कलानी गटाची साथ मिळाली आहे. याच कलानी गटाने गेल्या पालिका निवडणुकीत भाजपला साथ दिली होती. त्यानंतर विधानसभा आणि लोकसभेत ते भाजपसोबत आहेत. पालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर कलानी गटाने भाजपला हादरे देण्यास सुरूवात केली आहे.

## भिवंडीत सरकारी जमिनीची विक्री

### महसूल विभागाच्या तक्रारीवरून 12 जणांविरोधात गुन्हा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी, ता. १४ (वार्ताहर) :** भिवंडी पालिकेडून कब्रस्तानासाठी आरक्षित जमीन परस्पर खरेदीखत करून विकली. याप्रकरणी शांतीनगर पोलिस ठाण्यात महसूल विभागाचे मंडळ अधिकारी यांनी दिलेल्या तक्रारीवरून १२ जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार शहरातील गौरीपाडा येथील सर्व्हे क्रमांक ७० ही शासकीय कब्रस्तान म्हणून आरक्षित आहे. जमीन कब्रस्तान या वर्गवारीतील असल्याचे माहीत असतानाही आपल्या मालकीची व कब्जात असल्याचे सांगत २७ एप्रिल ते १९७६ पासून आजपर्यंत खरेदी-विक्री करून फसवणूक केली. याप्रकरणी तक्रार मिळाल्यावर महसूल विभागामार्फत सखोल चौकशी करून मंडळ अधिकारी शैलेश भोजने यांनी दिलेल्या तक्रारीवरून केशव तुकाराम टावरे, मोतीराम तुकाराम टावरे, गणपत तुकाराम टावरे, बळीराम तुकाराम टावरे, श्रीमती बबई धर्माजी पाटील, श्रीमती बारकुबाई महादेव केणे, श्रीमती चांगुणाबाई तुकाराम टावरे सर्व रा. भोईवाडा, मोहम्मद कासीम समरु, फैय्याज अहमद मोहम्मद ताहीर, अब्दुल गणी मोहम्मद सरदार, मोहम्मद हनीफ ताहीर, मौलाना मोह हुसेन असलमी या १२ जणांविरोधात फसवणूक केल्याप्रकरणी शांतीनगर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## कल्याण पूर्वेत सरकता जिना बसवा

### केडीएमसी आयुक्तांचे रेल्वेला साकडे

**रेल्वे प्रशासनाकडून या मागणीची दखल घेतली जात नसल्याने सामाजिक कार्यकर्ते नितीन निकम यांनी यासंदर्भात पालिकेकडे या सुविधेसाठी सहकार्य करण्याची मागणी केली होती. या पत्राची गंभीर दखल घेत आयुक्त गोयल यांनी मध्य रेल्वेचे विभागीय व्यवस्थापक यांना पत्र लिहून कल्याण पूर्व भागातील स्कायवॉकलगत नाल्या जवळच्या जागेत पुलाखाली सरकता जिना आणि उदवाहनाची आपण उभारणी करू शकता असे सुचविले आहे. या कामासाठी एकूण सुमारे चार कोटी ६० लाख रूपये खर्च अपेक्षित आहे.**

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण -** कल्याण पूर्व भागातून दररोज शेकडो नागरिक रेल्वे स्थानकात जाण्यासाठी प्रवास करतात. अनेक ज्येष्ठ नागरिक, वृध्द, दिव्यांग, विविध व्याधीग्रस्त याच मार्गाने रेल्वे स्थानक ते कल्याण पूर्व प्रवास करतात. कल्याण पूर्व रेल्वे स्थानकाजवळ सरकता जिना, उदवाहन नसल्याने दररोज प्रवाशांचे हाल होत आहेत. त्यामुळे प्रवाशांच्या मागणीचा विचार करून कल्याण पूर्व रेल्वे स्थानकाजवळील स्कायवॉकलगत सरकता जिना, उदवाहन उभारणीसाठी पुढाकार घ्यावा, अशी मागणी कल्याण डोंबिवली पालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी मध्य रेल्वेचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक यांच्याकडे केली आहे.

कल्याण पश्चिमेत रेल्वे स्थानकालगत प्रवाशांच्या सोयीसाठी सरकते जिने, उदवाहन आहे. मग कल्याण पूर्व भागात ही सुविधा का नाही. कल्याण पूर्व भागातून शेकडो प्रवासी दररोज येजा करतात. अनेक प्रवासी ज्येष्ठ नागरिक, वृध्द, व्याधीग्रस्त, दिव्यांग असतात. त्यांना स्कायवॉकचे अवघडलेले जिने चढून रेल्वे स्थानकात जाणे शक्य नसते. त्यामुळे अशा प्रवाशांची रेल्वे स्थानकात जाताना किंवा कल्याण पश्चिमेत जाताना दमछाक होते. यासाठी कल्याण पूर्व रेल्वे स्थानक भागात सरकता जिना आणि दिव्यांचा विचार करून उदवाहनाची उभारणी करावी म्हणून मागील दीड वर्षापासून कल्याण पूर्व भागातील सामाजिक कार्यकर्ते नितीन निकम कल्याण डोंबिवली पालिका, रेल्वे प्रशासनाकडे मागणी करत आहेत.



## कल्याण तालुक्याच्या ग्रामीण भागत बिबट्याची दहशत !

### रोहण- वाहोली परिसरात बिबट्याचे वारंवार दर्शन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण सारख्या मोठ्या शहरात तालुक्यातील ग्रामीण भागत बिबट्याची दहशत असल्याचे दिसून येत आहे. ग्रामीण भागातील रोहण – वाहोली परिसरात बिबट्याचा मुक्त संचार सुरु असून या बिबट्यामुळे परिसरातील कुत्र्यांवर वारंवार हल्ले देखील होत आहे. त्यामुळे नागरिकांना आता सतर्कतेचे आवाहन करण्यात आले आहे. मागच्या महिनाभरापासून रोहण- वाहोली गाव परिसरात बिबट्याचे वारंवार दर्शन होत आहे. आता वनविभाग आणि प्राणीमित्र पथकाने बिबट्याला सुरक्षितरीत्या पकडण्यासाठी शोधमोहीम सुरू केली आहे. परिसरात प्रत्यक ठिकाणी पिंजरे लावण्यात आले असून, तज्ञ अधिकारी आणि स्थानिक ग्रामसुरक्षा समिती एकत्रितपणे हालचालीवर लक्ष ठेवण्यात येत आहे. बिबट्या दिसल्यास तात्काळ वनविभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन देखील वनविभागातर्फे करण्यात आले आहे. बिबट्याच्या सततच्या वावरत आणि सतत होणाऱ्या हल्ल्यात काही जण मृत्युमुखी पडल्याची देखील माहिती आहे. मिळालेल्या माहितीनुसार, गेल्या महिनाभरापासून रोहण- वाहोली गाव परिसरात बिबट्याचे वारंवार दर्शन होत असून, त्याने परिसरातील अनेक वेळा कुत्रे आणि जनावरांवर हल्ला केला आहे








# रईस शाळेतील विद्यार्थ्यांची भिवंडी महानगरपालिका मुख्यालयास शैक्षणिक भेट

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी :** दिनांक 13/11/2025 रोजी रईस हायस्कूल भिवंडी येथील शालेय विद्यार्थ्यांनी भिवंडी मनपा मुख्यालास शैक्षणिक भेट दिली. या वेळी विद्यार्थ्यांनी महानगर पालिकेच्या विविध विभागांना भेट देऊन कामकाजा संबंधी माहिती जाणून घेतली. विद्यार्थ्यांनी मुख्यालयातील प्राथमिक शिक्षण विभाग, वैद्यकीय आरोग्य, उद्यान, बांधकाम, पाणीपुरवठा इत्यादी विभागांच्या अधिका-यांशी संवाद साधला व कामकाजाचे स्वरूप जाणून घेतले. प्रशासन अधिकारी शिक्षण) श्री. सौदागर शिखरे यांनी महानगर पालिकेच्या शाळांविषयी माहिती दिली. आणि महानगर पालिकेतील विविध विभागांबाबत थोडक्यात माहिती दिली. त्या नंतर विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष विविध विभागांमार्फत कामकाज कसे चालते हे पाहण्यासाठी सर्व विभागांना भेट देण्यात आली. त्या मधे वैद्यकीय आरोग्य विभागाचे मुख्य वेद्यकीय अधिकारी डॉ. संदीप गाडेकर यांनी महानगरपालिकेच्या आरोग्यकेंद्र व त्या मार्फत दिल्या जाणाऱ्या आरोग्य सुविधा याबहल मार्गदर्शन केले. एका विद्यार्थ्याने प्रश्न विचारला की ज्या प्रमाणे भिवंडी शहर पोलिओ मुक्त झाले आहे तसेच TB मुक्त कधी होईल. यावर डॉ. गाडेकर यांनी विद्यार्थ्यांना TB होण्याची कारणे व घ्यावयाची खबरदारी तसेच त्यावरील



औषधोपचार यावाचत मार्गदर्शन केले. तसेच महानगरपालिकेने सुरू केलेल्या आपला दवाखाना या उपक्रमाबाबत माहिती दिली. उद्यान विभागामध्ये उद्यान अधोक्षक यांनी मुलांचे स्वागत केले आणि पर्यावरण संतुलनासाठी झाडांचे महत्व समजावून सांगितले तसेच भिवंडी शहरातील उद्याने तसेच मीयावाकी वने या बाबत Slide Show द्वारे माहिती दिली. पाणीपुरवठा विभागातील कार्यकारी अभियंता श्री. संदीप पटनावर यांनी भिवंडी शहराला होणारा पाणी पुरवठा आणि प्रती व्यक्ती पाण्याची गरज या बाबत माहिती दिली. तसेच रेन वॉटर हार्वेस्टिंग बाबात माहिती दिली. पाण्याचे जलचक्र समजावून सांगितले आणि विद्यार्थ्यांनो भिवंडी शहरातील पाण्याच्या समस्ये बहल विचारलेल्या प्रश्नाना उत्तर देताना पाणी हे आपण निर्माण करू शकत नसल्याने आणि पावसाच्या पाण्यावर अवलंबून राहावे लागत असल्याने पाण्याचा वापर जपून करण्याचे व अपव्यय टाळण्याचे सांगितले. यावर विद्यार्थ्यानी समुद्राचे पाणी पिण्यायोग्य कसे करता येईल असा प्रश्न विचारला असता त्यावर त्यांनी सांगितले की होय समुद्राच्या पाण्याची कृत्रिम रित्या वाफ करून वाफे पासून पिण्या योग्य पाणी करण्याची पद्धत gulf country मधे वापरली जाते परंतु ती खर्चिक असल्याने भारतात त्याचा फारसा वापर केला जात नाही. बांधकाम विभागात उप अभियंता श्री विनोद मते यांनी विद्यार्थ्याना डांबरी रस्ते आणि RCC रस्ते यातील फरक समजावून सांगितला तसेच भिवंडी शहरातील रस्त्यांना खड्डे का आहेत याचे उत्तर देताना रस्त्यांचा प्रकार, पावसाचे पाणी वाहून नेण्याची क्षमता व रस्त्याचा वापर करणाऱ्या लोकांची संख्या व क्षमता याचे प्रमाण समजावून सांगितले आणि आता भविष्यात जास्त टिकाऊ रस्त्याचे बांधकाम करण्यात येत असल्याचे सांगितले.

या नंतर विद्यार्थ्यांनी मा. उपायुक्त (शिक्षण) श्री. बाळकृष्ण क्षीरसागर यांचे दालनास भेट दिली त्या वेळी विद्यार्थ्यांनी त्याच्या शालेय जीवना विषयी प्रश्न विचारला असता त्यांनी त्यांचा संपूर्ण आजवरचा प्रवास व अभ्यासाविषयी माहिती दिली तसेच स्पर्धा परीक्षांमध्ये यश संपादन करणेबाबत मार्गदर्शन केले आणि विद्यार्थ्यांना पुढील भविष्या साठी शुभेच्छा दिल्या. मा अतिरिक्त आयुक्त श्री. विठ्ठल डाके यांचे दालनात विद्यार्थ्यांनी भेट दिली असता डाके सरानी मुलांना महानगरपालिकेच्या प्रशासकीय अधिकारी आणि लोक प्रतिनिधी या दोन बाजू असतात प्रशासनाचे प्रमुख मा. आयुक्त साहेब असतात व लोकप्रतिनिधी प्रमुख मा. महापौर असतात हे समजावून सांगितले. विद्यार्थ्यांना महानगरपालिकेचे स्व विलासरावजी देशमुख सभागृह दाखविण्यात आले व प्रशासनाचे कामकाजाबाबत ध्येय व धोरणे याबाबत सभागृहात चर्चेद्वारे निर्णय घेतले जातात हे मुलांनों जाणून घेतले महानगर पालिकेतील विविध विभागांचे कामकाज जाणून घेतल्या नंतर विद्यार्थ्यांना मा आयुक्त सो यांना भेटण्याची उत्सुकता होती. मा. आयुक्त सो यांचे दालनामध्ये प्रवेश करताना विद्यार्थ्यांचे मनामध्ये ई Officer कसे बनतात त्या साठी किती मेहनत करावी लागते, अभ्यास कसा करायचा या बाबत अनेक प्रश्न होते त्यांनी मा. आयुक्त सो यांना प्रश्न विचारून माहिती जाणून घेतली.मा.आयुक्त श्री. अनमोल सागर यांनी विद्यार्थ्यांना त्यांनी आज महानगर पालिकेतील कोण कोणत्या विभागांना भेट दिली आणि कोणती माहिती मिळाली या बद्दल विचारले आणि विद्यार्थ्यांशी संवाद साधला. विद्यार्थ्यांना शिस्त आणि मेहनत याचे महत्व समजावून सांगितले तसेच IAS होण्याची पहिली पायरी म्हणजे नियमित वृत्तपत्र वाचन करण्यास सांगितले आणि अभ्यासावर लक्ष केंद्रित करण्याबाबत मार्गदर्शन केले. तसेच केवळ IAS नाही तर सर्व क्षेत्रात पुढे येण्यासाठी शिस्त व मेहनत आवश्यक असल्याचे सांगितले. तसेच त्यांनी विद्यार्थ्यांना स्वयं रोजगारासाठी शासनाच्या विविध योजना असतात त्या बाबतीत माहिती करून घेण्यास सांगितले. आपले भिवंडी शहर स्वच्छ ठेवणे, कायदा व सुव्यवस्था पाळणे हे एका जागरूक नागरिकाचे कर्तव्य असल्याचे त्यांनी सांगितले. आणि यानंतर सर्व विद्यार्थ्यांना पेन आणि चॉकलेट देऊन निरोप दिला. अशा प्रकारे आज प्राथमिक शिक्षण विभागातर्फे रईस हायस्कूल भिवंडी येथील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भेटीचे आयोजन करण्यात आले.

# काँग्रेसचे ठाणे ग्रामीण जिल्हाध्यक्ष दयानंद चोरघे यांचा राजीनामा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



**भिवंडी :** ठाणे जिल्ह्यात नगरपालिका व जिल्हा परिषद निवडणुक प्रचाराचे वारे जोमात वाहत आहेत. उमेदवारांच्या मुलाखती व बैठका जोमात सुरू आहेत असे असताना काँग्रेस पक्षाचे ठाणे ग्रामीण जिल्हाध्यक्ष दयानंद चोरघे यांनी आज अचानकपणे आपल्या जिल्हाध्यक्ष पद व काँग्रेस पक्षाचे प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा दिल्यामुळे पक्षाला मोठे खिंडार पडले असुन पक्षातील कार्यकर्ते व पदाधिकारी आणि उमेदवारा मध्ये आश्चर्य व्यक्त केले जात आहे.त्यांनी दिलेल्या राजिनामा पत्रामुळे आगामी होणाऱ्या निवडणुकीच्या प्रचारावर होणार असल्याची चर्चा सुरू झाली आहे.

ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण व शहरी भागात काँग्रेस पक्ष मजबूत करण्यात जिल्हाध्यक्ष दयानंद चोरघे यांचा सिंहाचा वाटा आहे. काँग्रेस पक्षाचे नेते खासदार राहुल गांधी यांच्या आग्रहास्तव त्यांनी भिवंडी पश्चिम विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढविली होती.आगामी होणाऱ्या पंचायत समिती व जिल्हा परिषद तसेच शहापूर, मुरबाड, भिवंडी ग्रामीण, अंबरनाथ बदलापूर निवडणूक अनुषंगाने चोरघे यांनी महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ व काँग्रेस पक्षाचे जेष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांच्या आदेशानुसार पक्षातील पदाधिकाऱ्यांचे नियुक्त्या करून निवडणुकीसाठी जोरदार मोर्चा बांधणी सुरू केली होती.तसेच इच्छुक उमेदवारांच्या बैठका व मुलाखती घेऊन निवडणुकीची तयारी सुरू केली असतानाच आज अचानकपणे दयानंद चोरघे यांनी
वैयक्तिक कारण पुढे करून काँग्रेस पक्षाचा सदस्य पद व ठाणे जिल्हाध्यक्ष पदाचा राजीनामा दिल्याचे सांगितले. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांना पाठविलेल्या लेखी पत्रात त्यांनी नमुद केले आहे कि ठाणे जिल्हा ग्रामीण कॉंग्रेस कमिटीचा अध्यक्ष म्हणून आता पर्यंत कार्यरत होतो. माझ्या वैयक्तिक कारणात्सव मी जिल्हाध्यक्ष पदाचा व कॉंग्रेस पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वचा राजीनामा देत आहे.तरी सदर राजीनामा मंजूर करणार यावा अशी विनंती दयानंद चोरघे यांनी केली आहे. चोरघे यांनी घेतले या निर्णयामुळे काँग्रेस पक्षातील शेकडो पदाधिकारी व कार्यकर्ते तीव्र नाराज झाले असुन ते सुध्दा पक्षाच्या सदस्य व पदाचा राजिनामा देणार असल्याचे सांगितले.

# पोलीस आणि ग्रामस्थांच्या अथक प्रयत्नानंतर चिमुकली सुखरूप सापडली

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण :** पेण तालुक्यातील हेटवणे वाडी येथील साडेचार वर्षाची चिमुकली अचानक बेपत्ता झाल्याची धक्कादायक घटना समोर आल्याने पोलीस प्रशासनाची चांगलीच धावपळ उडाली आहे.

सविस्तर बातमी अशी की, बुधवार दिनांक 12 नोव्हेंबर रोजी सकाळी आठ वाजण्याच्या सुमारास किशोरी किरण महालकर ही साडेचार वर्षाची मुलगी हरवल्याने सगळीकडे धावाधाव सुरू झाली.४८ तासांचा कालावधी उलटून जाऊन पोलिस





व गावकरी असे २०० जणांनी जंगल परिसर पिंजून काढला . पेण पोलिस निरीक्षक संदीप बागुल यांच्या मार्गदर्शनाखाली शोध पथक घटनास्थळी दोन दिवस तपास करत होते परंतु काही हाती लागले नाही. सदरची घटना पोलिस अधीक्षक आंचल दलाल यांना समजताच पोलिस प्रशासनाने ॲक्शन मोड घेत सीआरपी, क्यूआरटी, श्वान पथक आणि खोपोली येथील बचाव पथकाला आमंत्रित करून परिसरात चारही दिशेला शोध मोहीम सुरू केली आहे. परंतु ४८ तास उलटून देखील या चिमुकलीचा कुठेही शोध लागत नसल्याने अनेक प्रश्न निर्माण होत होते. आज दोन डोंगर पार करून तिस-या डोंगरावर तपास सुरू केला असता अचानक मुलीच्या रडण्याचा आवाज ऐकू आल्याने त्या दिशेने पोलीस पथक गेले असता मुलगी सुखरूप मिळाली.सदर मुलीला पेणच्या उपजिल्हा रुग्णालयात दाखल करून तिच्यावर उपचार सुरू केले आहेत. याबाबतचा अधिक तास पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली अप्पर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवतारे उपविभागीय पोलिस अधिकारी जालिंदर नालकुल यांच्या सहकार्याने पेण पोलिस निरीक्षक संदीप बागुल करत आहेत.

# "एल्डर लाईन" 14567 ज्येष्ठांसाठी मदतीचा आधार

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालय, भारत सरकार, राष्ट्रीय सामाजिक संरक्षण संस्था आणि राज्य सरकारच्या सहकार्याने जेष्ठ नागरिकांसाठी 14567 राष्ट्रीय हेल्पलाईन ही सेवा देशभरातील सर्व राज्यात आणि केंद्रशासित प्रदेशात वयोवृद्धांसाठी सुरु करण्यात आली आहे. जनसेवा फाउंडेशन, पुणे यांच्यामार्फत ही सेवा महाराष्ट्रात राबविली जाते. "मानवसेवा हीच ईश्वर सेवा" हे ब्रीद वाक्य घेऊन संस्थापक अध्यक्ष डॉ.विनोद शहा (MD) यांच्या मार्गदर्शनाखाली जनसेवा फाउंडेशन पुणे गेली 37 वर्षापासून सातत्याने आपल्या विविध प्रकल्पाद्वारे गरीब, आजारी, वृध्द, अपंग, निराधार, गरीब मुले-मुली आणि महिला यांची सेवा करीत आहेत. जनसेवा फाउंडेशनला संयुक्त राष्ट्रसंघाचा विशेष दर्जा प्राप्त आहे.

**महाराष्ट्रातील अंमलबजावणी:-**

ऑगस्ट 2021 पासून सुरू झालेल्या या 14567 राष्ट्रीय टोल-फ्री हेल्पलाईनवर आतापर्यंत 4 लाखांहून अधिक कॉल्स आले असून, 30 हजारांहून अधिक प्रकरणांमध्ये क्षेत्रीय पातळीवर प्रत्यक्ष मदत करण्यात आली आहे.

**हेल्पलाईनद्वारे मिळणाऱ्या मोफत प्रमुख सेवा:-**

**माहिती:** आरोग्य, पोषण, निवारा, आश्रयगृह व वृद्धाश्रम, डे केअर

**समाजातील प्रत्येक ज्येष्ठ नागरिकांनी जागरूक व्हावे आणि सर्व गरजू वयोवृद्धांनी या एल्डर लाईनचा लाभ घ्यावा**

सेंटर, याबाबत माहिती.

**मार्गदर्शन:** कायदेविषयक, मालमत्ता व कौटुंबिक वादांमध्ये मोफत कायदेशीर सल्ला, पेन्शन योजना, ज्येष्ठ नागरिकांसाठी चरितार्थ व कल्याणासाठी अधिनियम 2007.

**भावनिक आधार:** मानसिक आजार व चिंता, ताण, राग इत्यादी व्यवस्थापन.

बेघर व अत्याचारग्रस्त वृद्धांसाठी मदत आणि पुनर्वसन, कुटुंबीयांशी संवाद, पोलिस प्रशासनाशी समन्वय, समुपदेशन.

"एल्डर लाईन 14567" ही केवळ हेल्पलाईन नाही तर ज्येष्ठ नागरिकांसाठी एक विश्वासाचा हात, एक सुरक्षित आधार आहे. या माध्यमातून वयोवृद्धांच्या गरजा समजून घेतल्या जातात आणि त्यांना सन्मानाने जगता येईल यासाठी आवश्यक ती मदत दिली जाते. ज्येष्ठांसाठी ही सेवा अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचावी यासाठी समाजातील प्रत्येकाने जागरूक व्हावे आणि सर्व गरजू वयोवृद्धांनी या एल्डर लाईनचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

# जि.प. शाळा बोरिवली येथे "बालदिन" साजरा



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड :** बालदिनानिमित्त जि. प.शाळा बोरीवली येथे पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमेस गुलाब पुष्प वाहून कार्यक्रमाला सुरुवात झाली. शाळेतील विद्यार्थ्यांची यावेळी भाषणे सादर केली. सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत नृत्य सादर केलं. उपस्थितांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत केले गेले. बाल दिनानिमित्ताने सरपंच सौ.रेश्माताई घरत यांच्या सौजन्याने PT चा ड्रेस वाटप करण्यात आला. त्याचबरोबर दुसरा शालेय गणवेश वाटप करण्यात आला. शालेय ग्रंथालय उदघाटन केले. बालसभा घेण्यात आली. निपुण अंतर्गत महिलांनी विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाच अध्यापन केलं...

या कार्यक्रमासाठी कान्होळ-बोरिवली सरपंचसौ. रेश्माताई घरत,उद्योजक बाळाशेठ घरत, ग्रामपंचायत सदस्य भरत घरत, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष वैशाली घरत,उपाध्यक्ष अंकिता घरत, स्वाती घरत, निकिता घरत, सोनाली घरत, दिशा घरत, महेश, घरत,निपुण महिला गट, पालक वर्ग, शाळेतील सर्व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन श्रीमती अर्चना मार्के यांनी केले तर सूत्रसंचालन नितीन राणे सरांनी केले.

# डॉ.सुश्रुत वैद्य वसंतस्मृती आदर्श शिक्षण संस्था चालक पुरस्काराने सन्मानीत

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** रविवार दि.९नोव्हेंबर २०२५ रोजी भारतीय जनता पार्टी शिक्षक आघाडी, कोकण विभागातर्फे वसंत स्मृती आदर्श शिक्षक पुरस्कार व गुणगौरव सोहळा पार पडला. यामध्ये कल्याणातील नामांकित बालक मंदिर संस्थेचे कार्यवाह दंत चिकित्सक डॉ.सुश्रुत भा.वैद्य यांना 'वसंत स्मृती आदर्श शिक्षण संस्था चालक पुरस्कारा'ने सन्मानीत करण्यात आले.हा पुरस्कार त्यांना महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक धोरण अंमलबजावणी समितीचे अध्यक्ष डॉ. विनयजी सहस्रबुद्धे यांचे शुभहस्ते देण्यात आला. यावेळी कोकण पदवीधर मतदार संघाचे लाडके व लोकप्रिय आमदार ॲड. निरंजन डावखरेसाहेब, आमदार श्री. संजयजी केळकर साहेब, कोकण शिक्षक मतदार संघाचे आमदार श्री. ज्ञानेश्वरजी म्हात्रे साहेब , भारतीय जनता पार्टी शिक्षक आघाडीचे पदाधिकारी व इतर मान्यवर उपस्थित होते.




डॉ. सुश्रुत वैद्य हे बालक मंदिर संस्थेच्या कार्यकारणीवर ९ वर्षापासून पदाधिकारी म्हणून काम करीत आहेत सध्या ते ६ वर्षापासून कार्यवाह म्हणून काम करीत आहेत. त्यांनी आपल्या सेवाकाळात आतापर्यंत अनेक कामे मार्गी लावण्यात महत्वपूर्ण योगदान दिले आहे. रोटरी क्लबच्या माध्यमातून १२ लाख निधी मिळवून,त्यांनी कॅप्टन रवींद्र माधव ओक हायस्कूलधील प्रयोग शाळेचे अद्ययावत असे नूतनीकरण केले आहे. संस्थेच्या कल्याणातील मराठी माध्यमाच्या प्राथमिक शाळेच्या नवीन इमारतीच्या बांधकामासाठी देखील त्यांचं अभूतपूर्व असं योगदान राहिलं आहे.तसेच संस्थेच्या चिंचले आश्रम शाळेच्या नवीन वस्तीगृहाचे बांधकाम सुरू करण्याच्या कामातही ते महत्वपूर्ण योगदान देत आहेत. त्यांनी शाळेत स्पोर्ट्स अकॅडमी सुरू केली आहे. रोटरी क्लब ऑफ न्यू कल्याणच्या अध्यक्षपदी असताना त्यांनी जवळपास १३५ शैक्षणिक व सामाजिक दर्जेदार व नाविन्यपूर्ण असे उपक्रम राबविले. रोटरी क्लबच्या माध्यमातून त्यांनी आतापर्यंत १००० दिव्यांग व्यक्तींना मोफत कृत्रिम पाय उपलब्ध करून दिले आहेत. तसेच रोटरी क्लब ऑफ न्यू कल्याणच्या अध्यक्षपदी असतांना त्यांनी कल्याण शहरामध्ये हिंदू नववर्ष स्वागत यात्रेचेही आयोजन केले होते. तसेच जिल्हास्तरीय बाल नाट्य महोत्सवाचेही आयोजन केले होते.त्यांना सामाजिक व शैक्षणिक कार्याची प्रचंड आवड आहे, ते आपला डॉक्टरी व्यवसाय सांभाळून बालक मंदिर संस्थेसाठी व रोटरी क्लबसाठी आपलं कायम महत्त्वपूर्ण योगदान देत आहेत.

कॅन्सर रुग्णांना अत्याधुनिक उपचार मिळावेत म्हणून Shaman Cancer Care हे अद्यावत कॅन्सर रुग्णालय त्यांनी चालू केले आहे. शासकीय योजनेतून अनेक कॅन्सर रुग्ण तेथे मोफत उपचार घेत आहेत.

डॉ. सुश्रुत वैद्य यांचे संस्था पदाधिकारी, मुख्याध्यापक,शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचेकडून कौतुक करण्यात येत आहे.

# भविष्यवेध



शनिवार
१५ नोव्हेंबर २०२५

**मेष**
व्यवसायात कुटुंबाकडून काही प्रमाणात पाठिंबा मिळू शकेल. कामाच्या ठिकाणी तुमच्या बोलण्यावर संयम ठेवणे फायदेशीर ठरेल. आरोग्य चांगले होईल.

**वृषभ**
खर्चावर नियंत्रण ठेवा.काही आशादायक गुंतवणुकीच्या संधी मिळू शकतात. नवीन कल्पना येत राहतील. निर्णय घेण्यासाठी दिवस चांगला आहे.

**मिथुन**
नोकरी बदलण्याचा विचार करू शकता, परंतु पुढे जाण्यापूर्वी तुम्ही फक्त एक चांगला पर्याय विचारात घ्यावा. प्रलंबित काम पूर्ण करण्यात यशस्वी व्हाल.

**कर्क**
तुमच्या प्रेम जोडीदारासाठी आजचा दिवस चांगला असेल.विचार सकारात्मक ठेवा आणि नकारात्मक विचारांना तुमच्यावर वर्चस्व गाजवू देऊ नका.

**सिंह**
अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी आजचा दिवस चांगला आहे. तुमची आर्थिक परिस्थिती देखील सुधारेल. आत्मविश्वास यशाची गुरुकिल्ली ठरेल.

**कन्या**
संयम आणि संयम राखाल, ज्यामुळे सर्व समस्यांवर उपाय शोधणे सोपे होईल. जुन्या मौल्यवान वस्तूंसाठी सौदेबाजी केल्याने तुम्हाला फायदा होईल.

**तुळ**
सकारात्मक दृष्टिकोन ठेवा. आज तुम्ही भविष्यातील योजनांवरही विचार करू शकता. यामुळे तुमचे ध्येय साध्य होण्यास मदत होईल.

**वृश्चिक**
नवीन कामे हाती घेण्याचा मोह होऊ शकतो. व्यवसायात वाढ होण्याची शक्यता आहे. काम अत्यंत काळजीपूर्वक करा

**धनु**
ज्येष्ठांचा सल्ला फायदेशीर ठरेल. आर्थिक लाभ होण्याची शक्यता आहे. कल सामाजिक कल्याणाकडेही असेल. शत्रू विरुद्ध जास्त काळ टिकू शकणार नाहीत.

**मकर**
मित्रांसोबत हस्तकला प्रदर्शनाला उपस्थित राहू शकता. तुम्ही सकारात्मक ऊर्जा टिकवून ठेवाल. कोणत्याही गोष्टीवर लगेच प्रतिक्रिया देणे टाळा.

**कुंभ**
धार्मिक तीर्थयात्रेला जाऊ शकता. राजकीय कार्यातही तुमची आवड वाढेल. तुमचे काम यशस्वी होईल. आज शेजाऱ्यांमध्ये तुमचा आदर वाढेल.

**मिन**
तुम्ही तुमच्या जबाबदाऱ्यांवर पूर्णपणे लक्ष केंद्रित कराल आणि प्रत्येक काम उत्साहाने पूर्ण करण्याचा प्रयत्न कराल. तुमच्या योजना बदलू शकतात.



# सफाई कर्मचाऱ्यांना वारसा हक्काचा लाभ

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** : ठाणे महानगरपालिकेतील सर्व सफाई कर्मचाऱ्यांना येत्या दोन महिन्यात वारसा हक्काचा लाभ देण्याचा निर्णय भाजप आ. संजय केळकर यांच्या अध्यक्षतेत झालेल्या बैठकीत घेण्यात आला आहे. या निर्णयामुळे अनेक वर्षापासून लाभाच्या प्रतीक्षेत असलेल्या कर्मचाऱ्यांना दिलासा मिळणार आहे. ठाणे महापालिकेतील



कर्मचाऱ्यांच्या अनेक मागण्या दीर्घकाळ प्रलंबित आहेत. त्यात विशेषतः सफाई विभागातील अनेक कर्मचाऱ्यांना वारसा हक्काचा लाभ मिळाला नाही. या पार्श्वभूमीवर कर्मचाऱ्यांच्या विनंतीनुसार केळकर यांनी महापालिका मुख्यालयात वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक घेतली. उपायुक्त गजानन गोदेपुरे, कार्मिक अधिकारी दयानंद गुंडप, महाराष्ट्र कामगार कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष दत्ता घुगे, सरचिटणीस अजित मोरे, आणि कोषाध्यक्ष सुधाकर शिंदे उपस्थित होते. बैठकीत गोदेपुरे यांनी येत्या दोन महिन्यांच्या आत वारसा हक्काची सर्व प्रकरणे निकाली

### ठाणे महापालिकेतील कर्मचाऱ्यांच्या अनेक मागण्या दीर्घकाळ प्रलंबित

काढली जातील, असे आश्वासन केळकर यांना दिले. शिक्षण विभागातील अनुकंपा तत्त्वावरील कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांवरही सकारात्मक चर्चा झाली.


## उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

### शहर अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे कार्यालय

### ई– निविदा क्र. २६८ (२०२५–२६)

उल्हासनगर महानगरपालिका शहरामधील खालील नमुद कामे योग्य वर्गातील ठेकेदाराकडून निविदा प्रणाली पध्दतीनुसार महानगरपालिकेच्या अटी व शर्तीस अधिन राहून दिनांक १५/११/२०२५ रोजी निविदा मागविण्याकरीता प्रसिध्द करण्यात येत आहे.

सदर निविदा प्रणालीबाबत इतर आवश्यक माहिती https://mahatenders.gov.in/ या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

| अ.क्र. | निविदा क्रमांक | कामाचे नांव | निविदा रक्कम (जी.एस.टी वगळून) | इसारा रक्कम | कालावधी | वर्गवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मपा/साबांवि/नोटीस/ २०२५-२६ | वर्ष २०२५-२६ मध्ये पावसाळयापुर्वी उल्हासनगर शहरातील रस्त्यांवरील खड्डे DBM, AC and Mastic ने भरणेबाबत. | ६,६४,९०,२४५/- | ३३२४५१/- | १२० दिवस | NA |

सदर निविदा प्रणालीबाबत इतर आवश्यक माहिती https://mahatenders.gov.in/ या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

सही /-
कार्यकारी अभियंता (साबांवि)
उल्हासनगर महानगरपालिका

जा.क्र.उमपा/पीआरओ/ ३७५/२०२५
दिनांक :- १४/११/२०२५


# 'दिल्ली-मुंबई फ्रेट कॉरिडॉरमुळे घोडबंदर रोडवरील अवजड वाहनांचे प्रमाण कमी होईल' - खासदार नरेश म्हस्के यांचे प्रतिपादन

### • ठाणे महानगरपालिकेतील बैठकीत घोडबंदर रोडवरील समस्यांचा घेतला आढावा

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** : घोडबंदर रोड हा सर्व राष्ट्रीय महामार्गांना जोडणारा महत्त्वाचा रस्ता आहे. मार्च २०२६मध्ये दिल्ली-मुंबई फ्रेट कॉरिडॉर हा मार्ग सुरू झाल्यावर जवाहरलाल नेहरू बंदरातून होणारी बहुतांश कंटेनर वाहतूक या मार्गावर जाईल. त्यामुळे घोडबंदर रस्त्यावरील अवजड वाहनांचे प्रमाण लक्षणीयरित्या कमी होईल, असे प्रतिपादन खासदार नरेश म्हस्के यांनी केले आहे.

घोडबंदर रोड आणि परिसरातील विविध समस्या आणि प्रलंबित विषयांचा आढावा घेण्यासाठी शुक्रवारी खासदार नरेश म्हस्के यांच्या अध्यक्षतेखाली विविध विभागांच्या आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. महापालिका मुख्यालय येथील कै. अरविंद पेंडसे सभागृह येथे झालेल्या या बैठकीस महापालिका आयुक्त सौरभ राव, अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी, नगर अभियंता प्रशांत सोनाग्रा, पोलीस उपायुक्त (वाहतूक) पंकज शिरसाट, प्रादेशिक परिवहन अधिकारी हेमांगिनी पाटील, माजी



नगरसेवक सिद्धार्थ ओवळेकर यांच्यासह ठाणे महापालिका, मेट्रो, एमएमआरडीए, सार्वजनिक बांधकाम विभाग, महावितरण, प्रादेशिक परिवहन विभाग यांचे अधिकारी, जस्टिस फॉर घोडबंदर रोड या संस्थेचे प्रतिनिधी, घोडबंदर रोड परिससरातील गृहसंकुलांचे प्रतिनिधी आदी उपस्थित होते.

घोडबंदर रोड परिसरातील समस्यांवर सर्व यंत्रणांच्या समन्वयाने तोडगा काढण्यासाठी या बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. प्रमुख समस्या रस्त्यांची असून खड्डे, पॅचवर्कचे उंचवटे यामुळे अपघात होत आहेत. उड्डाणपुलावरील रस्त्याची स्थिती चांगली नाही. त्यावर तत्काळ उपाय करण्याचे निर्देश खासदार म्हस्के यांनी या बैठकीत दिले. एमएमआरडीए आणि सार्वजनिक बांधकाम विभागांनी ही दुरुस्तीची कामे तातडीने करावीत. ती १० डिसेंबरपर्यंत पूर्ण करावीत, असेही त्यांनी सांगितले.

दिल्ली- मुंबई फ्रेट कॉरिडॉरचे काम मार्चपर्यंत पूर्ण होणार आहे. त्यामुळे कंटेनरचा ३० ते ३५ टक्के भार त्या मार्गावर जाणार आहे. तसेच, खानिवडे ते आमणे येथील मिसिंग लिंक जोडल्यास घोडबंदर रोडवरील आणखी भार कमी होणार आहे. त्यासाठी महापालिका राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडे पाठपुरावा करीत आहे. हा विषय जलद मार्गी लागावा यासाठी ठाणे जिल्हाधिकारी यांच्याकडे लवकरच बैठक आयोजित करण्याच्या सूचनाही या बैठकीत खासदार म्हस्के यांनी दिल्या.

त्याचवेळी, घोडबंडर रोड आणि इतर रस्त्याचा स्वीकार करण्यास महापालिका तयार आहे. मात्र, हस्तांतरणापूर्वी, सध्या या रस्त्याचा ताबा ज्या यंत्रणांकडे आहे, त्यांनी ते रस्ते सुस्थित आणून ठेवावेत. मगच महापालिका त्यांचा ताबा घेईल, असे या बैठकीत महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी स्पष्ट केले.

वाहतूक, रिक्षा आदींबाबत काहीही तक्रारी असतील तर त्या नागरिकांनी महाट्रॅफिक या पोलीसांच्या ॲपव नोंदवाव्यात, असे आवाहन यावेळी पोलीस उपायुक्त (वाहतूक) पंकज शिरसाट यांनी केले.

या बैठकीत, जस्टिस फॉर घोडबंदर रोड या संस्थेच्या प्रतिनिधींनी तसेच परिसरातील नागरिकांनी घोडबंदर परिसरातील अंतर्गत रस्ते, पाणी पुरवठा, स्वच्छता, वाहतूक कोंडी आदींबाबत विविध समस्या आणि सूचना मांडल्या. माजी नगरसेवक सिद्धार्थ ओवळेकर यांनी साकेत ते गायमुख या कोस्टल रोडचा गायुमख ते फाऊंटन-वर्सोवा इथपर्यंत विस्तार करण्याची सूचना मांडली. तसेच, ओवळा-मोघरपाडा हा अंतर्गत रस्ता विकसित केल्यास त्याचा परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळेल, असेही त्यांनी स्पष्ट केले.


## कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

### जाहिर सूचना

ज्याअर्थी, कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील २७ गांवाच्या अधिसुचीत क्षेत्रामधील नांदिवली तर्फे अंबरनाथ येथील म्हसोबा मंदिर रोडपासून (तलावा लगत) ते ४५.०० मी. रुंद विकास योजना रस्त्यापर्यंत अस्तित्वातील ६.०० मी. विद्यमान रस्ता आहे सदर रस्ता मंजुर विकास योजनेतील नसल्याने सदर रस्ता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१० अन्वये विकसित करण्याचा महापालिकेचा मानस आहे.

ज्याअर्थी, सदर रस्त्याचे प्रत्यक्ष जागेवर सर्व्हेक्षण करण्यात आले असून सर्व्हेक्षण नकाशावर (A-B-C-D) याप्रमाणे दर्शविला आहे. २७ गांवाच्या मंजुर विकास योजनेत सदर विद्यमान रस्त्यास रुंदीकरण प्रस्तावित करण्यात आलेले नाही. त्या अनुषंगाने सदर परिसरातील दिवसेंदिवस वाढणारी लोकसंख्या, तसेच त्या प्रमाणात वाढणारी वाहतुक व आरोग्य सेवा इत्यादी बाबींचा विचार करुन जनहिताच्या दृष्टीने उक्त रस्ता ९.०० मीटर रुंद करण्याचा कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचा मानस आहे. सदरच्या रस्त्याच्या दोन्ही बाजुकडील रुपरेषा मा. आयुक्त महोदय यांनी दि. १०/११/२०२५ रोजीच्या मान्यतेने विहीत करण्यात आलेली आहे.

त्याअर्थी, या जाहिर सूचनेव्दारे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१० मधील तरतुदीनुसार सदर परिसरातील तसेच कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हद्दीतील सर्व नागरीकांना याद्वारे जाहिर करण्यात येते की, उक्त रस्ता ९.०० मी. रुंद करुन त्या रस्त्याच्या दोन्ही बाजुच्या रेषा कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या नगररचना विभागात उपलब्ध असलेल्या नकाशाप्रमाणे विहीत करण्यात येत आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१० प्रमाणे कोणीही वरील प्रमाणे विहीत केलेल्या रस्त्याच्या रेषेत कोणत्याही प्रकारचे बांधकाम करु शकणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

१) नोटीस प्रसिध्द झालेल्या दिनांकापासून एक महिन्याच्या मुदतीत नागरीकांनी आपल्या सूचना व हरकती असल्यास मा.प्रशासक तथा आयुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिका द्वारा महापालिका सचिव, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण यांच्याकडे लेखी स्वरुपात दयावे.

२) सदर नोटीस व नकाशाची प्रत नागरीकांच्या माहितीसाठी नगररचना विभाग, मुख्यालय यांचे नोटीस बोर्डावर व ९'आय' प्रभाग कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर लावण्यात आली आहे.

सही/-
(संतोष ना. डोईफोडे)
सहाय्यक संचालक नगररचना,
कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

जा.क्र : कडोंमपा/जसंवि/मुका/६६९ दिनांक :- १४/११/२०२५


संपादकीय

# नेत्यांचे पक्ष बदल आणि कार्यकर्त्यांचा संभ्रम



राजकारणात पक्षांतर ही नवी गोष्ट नाही; निवडणुका आल्या कि पक्षांतर पर्व सुरु होते. सोयीचे आणि सत्तेचे राजकारण हाच उद्देश ठेऊन पक्ष बदल केले जातात. नेते सहज निर्णय घेतात. कार्यकर्ते मात्र त्याच नेतासाठी केलेला संघर्षाची जखम घेऊन घायाळ बनतात. हे वास्तव चित्र गेल्या काही वर्षांत त्याचे प्रमाण ज्या वेगाने वाढले आहे, ते पाहता कार्यकर्त्यांच्या मनात निर्माण झालेला संभ्रम आणि अस्वस्थता दुर्लक्षित करता येत नाही. एकीकडे नेता स्वतःचा राजकीय प्रवास 'विकास', 'संघटन', किंवा 'अधिक व्यापक मंच' या नावाखाली बदलत असल्याचे सांगतो; तर दुसरीकडे वर्षानुवर्षे झिजून काम करणारा सर्वसामान्य कार्यकर्ता स्वतःला फसवला गेल्यासारखे मानू लागतो. नेत्यांच्या पक्षबदलामागे साधारणपणे तीन कारणे दिसतात— सत्तासमीकरणात स्वतःचा प्रभाव टिकवणे,स्वतःची सत्तेतील खुर्ची मिळविणे त्यासाठी. तिकीटाची खात्री, घेणे येथे. विचारसरणीपेक्षा वैयक्तिक लाभाला प्राधान्य.असते.

परंतु या राजकीय 'शह-काटशहां'च्या खेळात खरी किंमत चुकवतो तो तळागाळातील कार्यकर्ता. ज्या पक्षाच्या ध्वजाखाली, ज्या विचारसरणीवर विश्वास ठेवून तो वर्षानुवर्षे समाजात काम करतो, तोच नेता अचानक प्रतिस्पर्धी पक्षात गेला तर कार्यकर्त्याच्या भूमिकेचा पाया हादरतो. "आपण कोणा साठी काम करतो आहोत? हे विचार खरे की ते?" हा प्रश्न त्याच्या मनात खोलवर रुततो. याचा थेट परिणाम संघटनेच्या कार्यक्षमतेवर होतो. स्थानिक स्तरावर असलेले समन्वय बिघडतात. कार्यकर्त्यांची प्रेरणा कमी होते. काही जण राजकारणापासून दुरावतात तर काही नव्या पक्षबदलाच्या लाटेत गोंधळून दिशा हरवतात.

पक्षबदलावर पूर्ण बंदी घालणे शक्य नाही; पण राजकीय नैतिकतेचे निकष कठोर करणे, निवडणुकीपूर्वी किमान वर्षभर पक्षांतराला थांबा देणे, आणि पक्षनिष्ठ कार्यकर्त्यांचा सन्मान वाढवणे ही काळाची गरज आहे. कारण पक्ष हे नेत्यांचे नव्हे, तर कार्यकर्त्यांच्या श्रमांचे आणि जनतेच्या विश्वासाचे घर असते. आजची सर्वात मोठी जबाबदारी कार्यकर्त्यांवर आहे— नेते बदलू शकतात, पण तुमची बांधिलकी, तुमचे सामाजिक काम आणि तुमची ओळख कोणत्याही पक्षापेक्षा मोठी आहे. राजकीय स्थैर्याचा पाया नेत्यांच्या बदलत्या वाटांवर नाही, तर तळागाळातील कार्यकर्त्यांच्या निष्ठा आणि प्रामाणिकपणावर उभा असतो.

# दृष्टिहीन विद्यार्थ्यांची जलदुर्ग मोहीम

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : महादरवाज्यावरील लोखंडी कडी, टोकदार खिळे, शतकानुशतकं उभ्या असलेल्या भिंती आणि तोफांचा स्पर्श घेत मुरुड जंजिरा किल्ल्याचा इतिहास 'ऐकला' आणि 'अनुभवला' अशी अनोखी सफर नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाइंड (नॅब) च्या २९ दृष्टिहीन विद्यार्थ्यांनी अनुभवली. जिजाऊ प्रतिष्ठान व नॅब यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ही जलदुर्ग मोहीम तीन तास



चालली आणि विद्यार्थ्यांच्या मनावर अविस्मरणीय ठसा उमटवून गेली. सामान्य पर्यटक ४५ मिनिटांत किल्ला पाहतात, पण या विद्यार्थ्यांनी प्रत्येक पाऊल इतिहासाच्या स्मृतीत कोरले. वाऱ्याच्या झुळकांनी आणि तोफांच्या स्पर्शाने त्यांच्या 'स्पर्श मोहिमेचा इतिहास' जिवंत झाला. या उपक्रमाचे नेतृत्व जिजाऊ प्रतिष्ठानचे चंद्रकांत साटम यांनी केले. त्यांच्या २९ स्वयंसेवकांच्या सहकार्याने संपूर्ण मोहीम यशस्वीपणे पार पडली. या मोहिमेला केंद्र पुरातत्त्व विभागाचे अधिकारी बी. जी. येलीकर, प्रकाश घुगरे आणि कर्मचारी वर्ग यांनी सहकार्य केले. स्वयंसेवक गणेश रघुवीर यांनी विद्यार्थ्यांच्या सुरक्षित प्रवासाची जबाबदारी सांभाळली. बोटीत चढणे आणि किल्ल्यावर उतरणे हे आव्हानात्मक काम त्यांनी अत्यंत काळजीपूर्वक पार पाडले.

# स्थानिक निवडणुकांसाठी वस्तू व सेवांचे दर निश्चितीबाबत आढावा बैठक

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** : जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयातील समिती सभागृहात नगरपरिषद/नगरपंचायत सार्वत्रिक निवडणूक 2025 मध्ये निवडणूक प्रचार व प्रसिद्धी करिता वापरण्यात येणाऱ्या वस्तू व सेवांचे दर निश्चित करण्याकरिता आढावा बैठक संपन्न झाली.या बैठकीस उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) रुपाली भालके, तहसिलदार सचिन चौधर, अन्न व औषध प्रशासन सहायक आयुक्त नितीन आहेर, सहायक कामगार आयुक्त ठाणे चेतन जगताप, उप अभियंता (विद्युत) प्र.श.शिवदास, सहायक अभियंता (विद्युत) नि.ह. पगार, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी रोहित काटकर, विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी आदी मन्यवर उपस्थित होते.

या बैठकीत जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांनी सर्व राजकीय पक्षातील प्रतिनिधींशी या दरपत्रकाबाबत आपल्या काही सूचना असल्यास सूचविण्याचे आवाहन केले. त्याबाबत सहायक कामगार आयुक्त चेतन



जगताप यांनी निवडणूक कामी पुरविण्यात येणाऱ्या मनुष्यबळाच्या दराविषयी बोलताना सांगितले की, हे जुने दर असून नवीन दर काढण्यात आले असल्यामुळे नवीन दर आकारण्यात यावे. त्याचप्रमाणे राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींनी ढोल, ताशा पथकाच्या दर आकारण्याबाबत फेरविचार व्हावा, असे आवाहन केले. शेवटी सर्व सूचना समजून घेतल्यानंतर, निवडणूक खर्च दरपत्रकाबाबत फेरविचार करुन सकारात्मक निर्णय घेण्यात येईल, असे जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांनी सांगितले.

# महाराष्ट्रातील खाजगी प्रसूती रुग्णालयांसाठी आरोग्य विभागाचा 'लक्ष्य–मान्यता' उपक्रम

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुंबई** : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून आणि पुढाकाराने राज्यातील खाजगी प्रसूती रुग्णालयांमध्ये सेवा गुणवत्ता वाढवून प्रसूतीदरम्यान होणाऱ्या मातामृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी राज्य शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने "लक्ष्य-मान्यता" (LaQshya-Certification) हा अभिनव उपक्रम सुरू केला आहे.

हा उपक्रम राज्यातील सर्व खाजगी रुग्णालयांमध्ये दर्जात्मक, सुरक्षित आणि आदरयुक्त प्रसूती सेवा (Respectful Maternity Care) सुनिश्चित करण्यासाठी राबविण्यात येत आहे. महाराष्ट्राने मागील काही वर्षांत मातामृत्यू कमी करण्यामध्ये उल्लेखनीय प्रगती केली असून, आता हा प्रयत्न खाजगी क्षेत्रापर्यंत विस्तारित करण्यात आला आहे.

"लक्ष्य-मान्यता" कार्यक्रमाचा मुख्य हेतू म्हणजे प्रसूतीदरम्यान माता आणि नवजात बालकांचे मृत्यूदर कमी करणे, खाजगी रुग्णालयांमधील सेवा गुणवत्ता, रुग्ण सुरक्षा आणि रुग्ण काळजीत सुधारणा करणे, प्रत्येक महिलेला सुरक्षित व आदरयुक्त प्रसूती अनुभव मिळवून देणे.

हा उपक्रम महाराष्ट्र शासनाचा सार्वजनिक आरोग्य विभाग, फेडरेशन ऑफ ऑब्स्टेट्रिक अँड गायनॉकॉलॉजिकल सोसायटीज ऑफ इंडिया (FOGSI) आणि Jhpiego या आंतरराष्ट्रीय आरोग्य संस्थेच्या सहकार्याने राबविण्यात येत आहे.

Jhpiego संस्थेमार्फत फॉग्सी आणि खाजगी रुग्णालयांना आवश्यक तांत्रिक सहाय्य, प्रशिक्षण आणि मूल्यांकन सहाय्य पुरविले जाणार आहे.

या कार्यक्रमांतर्गत खाजगी प्रसूती रुग्णालयांना २६ मानकांवर आधारित प्रशिक्षण व मूल्यांकन दिले जाईल. ही मानके फॉग्सी आणि आरोग्य विभागाच्या तज्ञांच्या सहकार्याने तयार करण्यात आली असून, त्यामध्ये पुढील चार प्रमुख घटकांचा समावेश आहे –

1. पायाभूत सुविधा आणि यंत्रणा मजबुतीकरण
2. साधनांची उपलब्धता व वापर
3. क्लिनिकल कौशल्ये आणि उपचार क्षमता
4. नोंद व अहवाल प्रणाली (Record & Reporting Mechanism)

यापैकी १६ मानके क्लिनिकल काळजीशी संबंधित असून, १० मानके आरोग्य संस्थात्मक व्यवस्थापनाशी निगडीत आहेत.

खाजगी प्रसूती रुग्णालयांतील कर्मचाऱ्यांना सेवा गुणवत्ता, सुरक्षितता आणि काळजी याबाबत सविस्तर प्रशिक्षण दिले जाईल.या प्रशिक्षणासाठी जिल्ह्यातील स्किल लॅब, VC रूम आणि प्रशिक्षण हॉल यांचा वापर करण्यात येईल. प्रशिक्षणादरम्यान लागू असलेले शासकीय शुल्क संबंधित संस्थांकडून अदा केले जाईल.




# केडीएमसी तर्फे पंडित जवाहरलाल नेहरू आणि क्रांतिकारक लहुजी साळवे यांना अभिवादन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू आणि थोर क्रांतिकारक लहुजी साळवे यांच्या जयंती दिनानिमित्त महापालिका मुख्यालयात त्यांच्या प्रतिमेस महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांच्याहस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी महापालिका अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड, योगेश गोडसे, मुख्य लेखा परिक्षक सुरेश बनसोडे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी दिग्विजय चव्हाण, उपआयुक्त वंदना गुळवे, समिर भुमकर, कांचन गायकवाड, कार्यकारी अभियंता रोहिणी लोकरे, शैलेश कुलकर्णी, प्रशासन अधिकारी भारत बोरणारे, शिक्षणाधिकारी विजय सरकटे, सहा.माहिती व जनसंपर्क अधिकारी सुमित बोयत, महापालिकेचे इतर अधिकारी व कर्मचारी तसेच समाज बांधव आणि नागरिक यांनी देखील पंडित जवाहरलाल नेहरू आणि लहुजी साळवे यांच्या प्रतिमेस पुष्पसुमने अर्पण करून अभिवादन केले.



# मुरबाडचा मिमिक्री मॅन गणेश देसलेची भन्नाट मिमिक्री



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड** : मुरबाड तालुक्यातील गणेश देसले हे नाव सध्या समाजमाध्यमांवर जोरदार व्हायरल होत आहे.

मिमिक्रीचे शो युट्युबवर कॉमेडी व्हिडिओ आणि भन्नाट मिमिक्री करून ते महाराष्ट्रभरात आपली कला सादर करत आहेत. अक्षय कुमार, सयाजी शिंदे, लक्ष्मीकांत बेर्डे, सुनील शेट्टी, मकरंद

### सोशल मीडियावर केला धुमाकूळ!

अनासपुरे, कीर्तनकार निवृत्ती महाराज देशमुख, जॉनी लिव्हर, शरद पवार, नरेंद्र मोदी, लता मंगेशकर,राजकुमार, नाना पाटेकर, परेश रावल, विजयराज, अजय देवगन, ऋतिक रोशन तात्या विंचू, निळू फुले, दादा कोंडके, राजकुमार, शक्ती कपूर, सनी देओल, शाहरुख खान सलमान खान अशोक सराफ यांसारख्या सुप्रसिद्ध कलाकारांची अप्रतिम मिमिक्री करून सोशल मीडियावर गणेश देसले रिलस्टार मिमिक्री मॅन मुरबाडचा मिमिक्री स्टार आवाजाचा बादशहा यांनी आवाजांची अप्रतिम नक्कल करत आहे.

गणेश देसले यांनी महाराष्ट्रातील अनेक महोत्सव, यात्रा, सोहळे आणि सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये आपले सादरीकरण करून प्रेक्षकांची दाद मिळवली आहे.त्यांच्या अभिनयात आणि आवाजात असलेली जिवंत अभिव्यक्तीच त्यांची ओळख बनली आहे. सध्या त्यांचे मिमिक्री व्हिडीओ सोशल मीडियावर जोरदार शेअर होत आहेत आणि लोक त्यांना "मुरबाड चा मिमिक्री मॅन कॉमेडी स्टार गणेश देसले मिमिक्रीचा बादशाह मास्टर" म्हणून ओळखत आहेत.

# कास्प संस्थेच्या गव्हर्निंग कौन्सिलच्या सदस्य पदी ॲड. मंगेश नेने

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण** : कास्प संस्थेच्या गव्हर्निंग कौन्सिलच्या नुकत्याच झालेल्या निवडणुकीत ॲड. मंगेश नेने यांची सदस्य म्हणून बिनविरोध निवड झाली आहे. सामाजिक कार्यातील त्यांच्या दीर्घ अनुभवामुळे आणि संस्थेच्या उपक्रमांमध्ये दिलेल्या सक्रिय योगदानामुळे ही निवड अपेक्षित मानली जात आहे. त्यांच्या निवडीमुळे संस्थेच्या कार्यात नवीन उर्जा आणि दिशा मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.



या निवडणुकीत माजी पोलिस महासंचालक जयंत उमराणीकर यांची गव्हर्निंग कौन्सिलच्या अध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली. कायदा-सुव्यवस्थेतील त्यांचा दीर्घ अनुभव आणि प्रशासनातील दांडगा पाया लक्षात घेता हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली कास्प संस्थेच्या विविध उपक्रमांना आणखी गती मिळण्याची शक्यता आहे. तसेच, भाग्यश्री डेंगळे यांची उपाध्यक्षपदी आणि निवेदिता दासगुप्ता यांची सदस्य म्हणून बिनविरोध निवड झाली आहे. महिला नेतृत्वाची वाढती उपस्थिती ही संस्था सक्षम आणि प्रगतिशील दिशेने वाटचाल करत असल्याचे चिन्ह असल्याचे जाणकारांचे मत आहे. नव्या गव्हर्निंग कौन्सिलकडून सर्व क्षेत्रात प्रभावी कार्यवाहीची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# पडघा - कल्याण रस्ता खड्ड्यात



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पडघा** : भिवंडी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारित असलेला व कल्याण शहराला जोडणारा महत्वाचा असा पडघा - कल्याण रस्त्याची खड्डयामुंळे दुर्दशा झाली असुन खड्डे कधी दुरुस्त करणार असा सवाल नागरीकांनी उपस्थित केला आहे.

पडघा- कल्याण रस्त्यावरील तळवली, सापे, वाशेरे, आमणे, सावद, बापंगाव, येथे रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले असुन त्या खड्डयातुन वाटचाल करताना वाहनचालकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे तसेच मोठ्या खड्डयामुळे रात्रीच्या वेळी वाहने खड्डयात आदळून अपघात होण्याची

### खड्ड्यांची दुरुस्ती कधी नागरीकांचा संतप्त सवाल?

शक्यता जास्त आहे. तसेच पडघा - कल्याण रस्त्यालगत विविध कंपन्यांची गोदामे, गौण खनिज उत्खनन खाणी आल्यामुळे जड वाहनांची संख्या दिवसेंदिवस या रस्त्यावर वाढत आहे तसेच खाजगी चारचाकी, प्रवाशी एसटी बसेस, आँटोरिक्षा, कॅब, मालवाहू टेम्पो यांची सुध्दा या रस्त्यावर रात्रंदिवस वर्दळ असल्याने हा रस्ता खुप महत्वाचा मानला जातो. तसेच अनेक महीन्यांपासुन या रस्त्यावर पडलेल्या मोठ्या खड्डयामुळे व या रस्त्यावर वाढलेल्या मालवाहू ट्रक, टेम्पो, कंटेनर, डंपर यामुळे या रस्त्यावर नेहमी वाहतुकीची कोंडी होऊन त्याचा फटका चाकरमानी, कामगार, एसटी बसेस, प्रवाशी वाहने, शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थी, रुग्ण, स्थानीकांना, वृद्धांना बसत आहे तर अनेक महीन्यांपासुन खड्डे दुरुस्त करण्याची ओरड होत असताना सुध्दा सार्वजनिक बांधकाम विभागाकडून जाणुन बुजून दुर्लक्ष होताना दिसत आहे. तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग खड्डयामुळे होणाऱ्या एखाद्या भिषण अपघाताची वाट बघतेय का असा संतप्त सवाल नागरीकांनी उपस्थित केला आहे.

# केडीएमसीच्या KD SWIFT या प्रणालीचा शुभारंभ

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण डोंबिवली महापालिकेच्या KD SWIFT या प्रणालीचा शुभारंभ आज करण्यात आला. शहराचा विकास जलद गतीने पारदर्शक व नियोजीत पध्दतीने होण्यासाठी ही प्रणाली कार्यान्वित करीत असल्याची, माहिती महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी दिली.हा कार्यक्रम महापालिका अधिकारी वास्तुविशारद, एमसीएचआय अध्यक्ष व इतर मान्यवर यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.





महाराष्ट्रात अशा प्रकारे प्रथमच KD SWIFT म्हणजेच SINGLE WINDOWS INTEGRATED FACILITATION TOOL ही प्रणाली विकसित केली आहे. या अंतर्गत BUILDING PERMISSION MANAGEMENT SYSTEM बरोबरच सर्व प्रकारचे "नाहरकत दाखले" म्हणजेच अग्निशमन विभागाचा नाहरकत दाखला, पाणी पुरवठा विभागाचा नाहरकत दाखला, जनि:/मनि: विभागाचा नाहरकत दाखला, उद्यान विभागाचा नाहरकत दाखला, कर विभागाचा नाहरकत दाखला इ. एक खिडकी योजना या प्रणालीद्वारे उपलब्ध होतील. तसेच या प्रणालीमध्ये डॅशबोर्डच्या माध्यमातून नागरीकांना आणि विकासकांना आपल्या अर्जाचे REAL TIME TRACKING करता येणार आहे. त्यामुळे ही प्रणाली विकासकांसह, नागरीकांसाठी मोठा दिलासा ठरणार आहे.

महापालिकेतील विविध प्रकारच्या विकास परवानग्या करीता शासनाने बीपीएमएस प्रणाली विकसित केलेली आहे. मात्र याकरीता आवश्यक "ना हरकत दाखले" हे विहीत कालावधीत तसेच एकाच प्लॅटफॉर्म वरुन कसे देता येतील, या अनुषंगाने महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांचे संकल्पनेतून ही प्रणाली तयार करण्यात आलेली आहे. याकरीता

### शहराचा विकास जलद गतीने पारदर्शक व नियोजीत पध्दतीने होण्यासाठी केडीएमसीचे पुरोगामी पाऊल

शासनाचे बिपीएमएस विभागाने केलेले सहकार्य तसेच यासाठी वास्तुविशारद, एमसीएचआय तसेच महापालिका नगररचना विभागाचे सहा.संचालक नगररचना संतोष डोईफोडे, नगररचनाकार सुरेंद्र टेंगळे तसेच माहिती व तंत्रज्ञान विभागाचे उपआयुक्त समिर भुमकर यांनी विशेष परिश्रम घेतले.

या नविन प्रणालीमुळे कोणत्याही नाहरकत दाखल्यासाठी व्यक्तीशः महापालिकेत जाण्याची आवश्यकता भासणार नाही. त्याचप्रमाणे प्रत्येक विभागाला ठरावीक कालमर्यादेत अर्जावर निर्णय देणे बंधनकारक करण्यात आले आहे. बनावट कागदपत्रांना आळा घालण्यासाठी प्रत्येक प्रमाणपत्रावर अधिकृत क्यूआर कोड देण्यात येणार आहे. त्याची सत्यता तात्काळ तपासता येईल. अर्ज दाखल केल्यानंतर 28 दिवसांत नागरीकांना आवश्यक परवानग्या प्राप्त होऊ शकतील.

BPMS आणि SWIFT या दोन्ही प्रणाली यशस्वीरित्या राबविणारी कल्याण-डोंबिवली महानगरपालिका ही महाराष्ट्रातील पहिलीच महापालिका ठरणार आहे, असे प्रतिपादन महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी यावेळी केले. जास्तीत जास्त नागरीकांनी या प्रणालीचा वापर करुन, महापालिकेस सहकार्य करावे, असे आवाहन महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी यावेळी केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक नगर रचना विभागाचे सहाय्यक संचालक संतोष डोईफोडे यांनी केले.

# नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात कुष्ठरुग्ण शोध अभियान

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी मुंबई** : समाजातील निदान न झालेले कुष्ठरुग्ण कमीत कमी कालावधीत जलद शोधून त्यांना उपचाराखाली आणणे व कुष्ठरोगाबाबत समाजात जनजागृती करणे या उद्देशाने केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार दि. 17 नोव्हेंबर ते 02 डिसेंबर 2025 या कालावधीत "कुष्ठरुग्ण शोध अभियान" ही मोहीम नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रात राबविण्यात येत आहे.

ही मोहीम आरोग्य विभागामार्फत राबविण्यात येणार असून महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली 182 पथकांच्या माध्यमातून 76,126 घरातील 3,41,339 लोकसंख्येला भेटी देण्यात येवुन नागरिकांची तपासणी व जनजागृती करण्यात येणार आहे. प्रत्येक पथक दररोज 30 घरांना प्रभावीपणे भेट देऊन माहिती संकलीत करेल अशाप्रकारे पथके तयार करण्यात आली आहेत.

प्रत्येक पथकामध्ये एक महिला व एक पुरुष कर्मचारी असणार आहे. प्रत्येक घरातील महिलांची तपासणी महिला कर्मचाऱ्यांमार्फत आणि पुरुषांची तपासणी पुरुष कर्मचाऱ्यांमार्फत करण्यात येणार आहे. कुष्ठरोगाकरिता त्वचेवर फिकट/लालसर बधीर चट्टा, त्याठिकाणी घाम न येणे, जाड व बधीर तेलकट/चकाकणारी त्वचा, त्वचेवर गाठी असणे, कानाच्या पाळया जाड होणे, भुवयांचे केस विरळ होणे, डोळे पूर्ण बंद न करता न येणे अशा प्रकारची लक्षणे विचारुन तपासणी केली जाणार आहे. यामध्ये कुष्ठरोगाची लक्षणे आढळल्यानंतर वैदयकिय अधिकारी यांच्याकडे निदानाकरीता संदर्भित करण्यात येणार आहे.

नमुंमपा कार्यक्षेत्रात शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार तपासणी कार्यक्षेत्राची निवड करण्यात आली असून यामध्ये झोपडपट्टी, बांधकाम मजूर, दगडखाणी इ. भागाचा समावेश करण्यात आला आहे. त्यानुसार 3,41,339 लोकसंख्येमध्ये 182 पथकांद्वारे मोहीम कालावधीत भेटी देण्यात येणार आहेत.

या अभियानामुळे समाजातील निदान न झालेले कुष्ठरुग्ण लवकरात लवकर शोधून त्यांना त्वरित बहुविध औषधोपचाराखाली आणणे, नवीन सांसर्गिक कुष्ठरुग्ण शोधून बहुविध औषधोपचाराद्वारे संसर्गाची साखळी खंडित करून होणारा प्रसार कमी करणे, कुष्ठरोग दुरीकरणाचे ध्येय साध्य करून कुष्ठरोग निर्मुलनाच्या दिशेने वाटचाल करणे हे उद्दीष्ट साध्य करण्यात येणार आहे.सदर मोहीमेमध्ये नागरिकांनी उत्तम प्रतिसाद देऊन स्वतःची कुष्ठरोगाबाबत तपासणी करुन घ्यावी व उद्दीष्ट साध्य करण्यात सहकार्य करावे असे आवाहन नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी केले आहे.

# डोंबिवलीत भव्य 'व्हिजन वॉक' बाल दृष्टी अभियान व डायबेटीसजन्य अंधत्वाविरोधात जनजागृती

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली** : महाराष्ट्र ऑप्थॅल्मॉलॉजिकल सोसायटी आणि डोंबिवलीकर ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने डोंबिवलीत रविवार, १६ नोव्हेंबर रोजी भव्य 'नेत्ररक्षा – डायबेटीस आय अवेअरनेस वॉक' आयोजित करण्यात आले आहे. डोंबिवलीत प्रथमच इतक्या मोठ्या प्रमाणावर आयोजित होणाऱ्या या उपक्रमातून मधुमेहामुळे होणाऱ्या डोळ्यांच्या आजारांविषयी तसेच लहान मुलांच्या दृष्टीसंबंधित समस्यांविषयी जागरूकता निर्माण करणे हे उद्दिष्ट आहे.

या रॅलीत भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि डॉ. अनघा हेरूर याचे मार्गदर्शन लाभणार आहे. गणेश मंदिर रोड येथून सकाळी ७ वाजता या रॅलीची सुरुवात होणार असून, शहरातील प्रमुख मार्गांवरून फिरल्यानंतर सकाळी ९ वाजता पुन्हा सुरुवातीच्या ठिकाणीच समारोप केला जाईल. या वॉकदरम्यान बाल दृष्टी संरक्षणाविषयी संदेश देणारे फलक, पोस्टर्स, घोषवाक्ये आणि जागरूकता घोषणाबाजीद्वारे नागरिकांना माहिती दिली जाणार आहे.

मधुमेहामुळे होणाऱ्या रेटिनाच्या विकारांबाबत सावधगिरीचे आवाहन करत डॉ. हेरूर म्हणाल्या "मधुमेहामुळे होणारे डोळ्यांचे विकार वेळेवर तपासणी केल्यास टाळता येतात. डोंबिवलीला डायबेटीसजन्य अंधत्वमुक्त बनवण्यासाठी आपण सर्वांनी



डॉक्टर अनघा हेरूर

पुढाकार घेतला पाहिजे." या वॉकमध्ये कॉलेज विद्यार्थी, डॉक्टर्स, रोटरी व रोटरॅक्ट क्लब्स, सामाजिक संस्था, स्वयंसेवक आणि नागरिक मोठ्या उत्साहाने सहभागी होणार आहेत. सर्व नागरिक, पालक, वरिष्ठ नागरिक आणि युवकांना या उपक्रमात सहभागी होऊन "वेळीच नेत्रतपासणी करा आणि दृष्टी सुरक्षित ठेवा" हा संदेश समाजात पोहोचवण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### लहान मुलांसाठी 'बालक दृष्टी अभियान'

बालदिनानिमित्त राबवण्यात येणारा 'बालक दृष्टी अभियान' हा मुलांच्या डोळ्यांची वार्षिक तपासणी करण्याचा महत्त्वाचा प्रकल्प आहे. पत्रकार परिषदेत बोलताना डॉ. अनघा हेरूर म्हणाल्या, "मुलांना दृष्टीदोषाची जाणीव होत नाही. परंतु वार्षिक स्क्रिनिंग झाल्यास नंबर वेळेत कळतो आणि योग्य उपचार सुरू करता येतात. त्यामुळे मुलांची दृष्टी सुरक्षित ठेवणे शक्य होते. यंदा बालक दृष्टी अभियानासह डायबेटीसजन्य नेत्रजागृतीलाही आम्ही विशेष महत्त्व दिले आहे."

# विश्व मधुमेह दिवसानिमित्त ज्येष्ठ नागरिकांसाठी आरोग्य शिबीर



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण पूर्वेतील सामाजिक कार्यकर्ते प्रज्वल खैरनार यांच्या तर्फे विश्व मधुमेह दिवसानिमित्त ज्येष्ठ नागरिकांसाठी विशेष मोफत डायबिटीस व नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. मंगलराघो नगर, लोकग्राम, चिकणीपाडा आणि जरीमरी नगर परिसरातील ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्याची जाणीव ठेवत प्रज्वल खैरनार यांच्या पुढाकाराने आणि डॉ. अग्रवाल आय हॉस्पिटल, कल्याण यांच्या तज्ज्ञ सहकार्याने हे शिबिर आयोजित करण्यात आले.

शिबिरामध्ये अनुभवी तज्ज्ञ डॉक्टर्सकडून मधुमेह तपासणी, नेत्र तपासणी, आरोग्य सल्ला व मार्गदर्शन या सेवा पूर्णपणे विनामूल्य देण्यात आल्या. ज्येष्ठ नागरिकांच्या सोयीसाठी मंगलराघो नगर येथून मोफत पिकअप–ड्रॉप सुविधा उपलब्ध करून देण्यात आली, ज्याचा मोठ्या प्रमाणात नागरिकांनी लाभ घेतला. या आरोग्य शिबिराला परिसरातील नागरिकांचा अत्यंत उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

# 'बिहारचा जनादेश - मोदींवरील विश्वासाचा शिक्का

### शिवसेना खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांची प्रतिक्रिया

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

बिहार विधानसभा निवडणुकीत 'एनडीए'ला मिळालेल्या विजयानंतर शिवसेना (शिंदे गट) चे खासदार आणि संसदीय पक्षाचे नेते डॉ. श्रीकांत शिंदे यांनी या जनादेशाचे स्वागत करत मोदी नेतृत्वावरचा जनतेचा विश्वास पुन्हा अधोरेखित केला आहे. डॉ. शिंदे म्हणाले, "बिहारला मिळालेला ऐतिहासिक जनादेश हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वावर जनतेने दाखवलेल्या अखंड विश्वासाचा ठोस पुरावा आहे." बिहारच्या जनतेने भ्रष्टाचार, अराजकता आणि जंगलराजाची आठवण करून



देणाऱ्या शक्तींना ठाम नाकारत "जंगलराज नव्हे, मंगलराज" निवडल्याचे ते म्हणाले. काँग्रेस आणि तिच्या सहयोगी पक्षांच्या पराभवाचा उल्लेख करताना त्यांनी सांगितले की, जाती-धर्माच्या समीकरणांवर आधारित राजकारण आता जनतेला मान्य नाही. काँग्रेसची आमदारसंख्या एकेरीत जाणे हे राहुल गांधी यांच्या नेतृत्वावरील विश्वासाचा पराभव असल्याचे ते म्हणाले. "राहुल गांधी यांनी जातीय कार्ड आणि धार्मिक मुद्द्यांवर उभारलेले नरेटिव्ह पूर्णपणे फोल ठरले आहे," अशी टीकाही त्यांनी केली. बिहारमधील गरीब, मागासवर्ग, महिला, युवा, शेतकरी आणि कामगार यांनी एकमुखाने एनडीएला साथ दिल्याचे ते म्हणाले. नीतीश कुमार यांच्या सुशासन, स्वच्छ प्रतिमा आणि जनकेंद्रित कार्यशैलीवर बिहारने शिक्कामोर्तब केल्याचे त्यांनी अधोरेखित केले. निवडणूक आयोगावरील टीकेचा उल्लेख करताना डॉ. शिंदे म्हणाले, "विरोधकांनी SIR सारख्या विषयावरून निवडणूक भरकटवण्याचा प्रयत्न केला आणि निवडणूक आयोगाची प्रतिष्ठा डागाळण्याचा प्रयत्न केला. बिहारच्या जनतेने या बेजबाबदार राजकारणाचा कठोर निषेध केला आहे." या जनादेशातून प्रचंड प्रो-इन्कंबन्सीची लाट दिसून येत असल्याचे ते म्हणाले. भारतात बदल हवा आहे, पण तो अराजकतेतून स्थिरतेकडे, भ्रष्टाचारातून जवाबदेहीकडे असावा आणि तो बदल केवळ एनडीएच देऊ शकते, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.





Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024